ePaper
जास्त टर-टर करू नका, गुणरत्न सदावर्तेंचा सयाजी शिंदेंवर हल्लाबोल

| वर्ष - 9 | अंक -101 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™




www.mahaenews.com | गुरुवार, दि. 4 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## महापालिका निवडणूक-आयोग सज्ज: हिवाळी अधिवेशनानंतरच निवडणुकीचा बिगुल?

# महापालिका निवडणुकीची लगबग!

## निवडणूक आयुक्तांची आजची बैठक या सर्व प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टर्निंग पॉईंट ठरण्याची चिन्हे



। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा पुढील मोठा टप्पा म्हणून सर्वांचे लक्ष आता महापालिका निवडणुकांकडे वेधले गेले आहे. नगरपालिका-नगरपंचायत निवडणुकांचा गोंधळ संपत असतानाच राज्य निवडणूक आयोगाने महापालिकांच्या तयारीसाठी हालचाली जलद केल्या आहेत. आज गुरुवारी निवडणूक आयुक्तांनी राज्यातील सर्व पालिका आयुक्तांची महत्त्वपूर्ण बैठक बोलावली असून, यात प्रामुख्याने मतदार याद्यांतील त्रुटी, दुरुस्तीची प्रगती, तांत्रिक तयारी, प्रभागनिहाय अद्यतन आणि मतदान केंद्रांच्या आराखड्याचा आढावा घेण्यात येणार आहे.**

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संपताच महापालिका निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला जाण्याची शक्यता आयोगातील सूत्रांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये निवडणूक वातावरण चांगलेच तापण्याची चिन्हे आहेत.

### मतदार याद्यांतील चुका, दुबार नावे — आयोगाची चिंता वाढली

मुंबईसह अनेक महापालिकांच्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये गेल्या काही आठवड्यांत मोठ्या प्रमाणावर दुबार नावे, चुकीचे प्रभाग, हरवलेली नावे, अधिवासाचा गोंधळ, आणि तांत्रिक त्रुटी आढळल्या आहेत. राजकीय पक्षांकडून हरकती व आक्षेप नोंदवण्यासाठी दिलेली मुदत बुधवारी (३ डिसेंबर) संपली असून, या कालावधीत प्रचंड प्रमाणावर तक्रारी दाखल झाल्याचे आयुक्तालयाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

**यात काही महत्त्वाच्या तक्रारी अशा :**
एका मतदाराचे नाव तीन-तीन ठिकाणी आढळले
शेजारच्या प्रभागातील नावे चुकीने दुसरीकडे नोंदली गेली
विधानसभा मतदार यादीत नावे असूनही पालिकेच्या यादीत न समाविष्ट होणे
१ जुलै 2025 च्या विधानसभा यादीशी समन्वय नसणे
न मेलेल्या नागरिकांची नावे अद्याप आढळणे

निवडणूक आयोगाने पालिका प्रशासनाला चुका त्वरित व काटेकोरपणे दुरुस्त करण्याचे आदेश दिले आहेत. आजची बैठक ही या दुरुस्तीच्या गतीचा आढावा घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

जिल्हा परिषद निवडणुका अडथळ्यात; BJP राजकीय नुकसान टाळण्याच्या प्रयत्नात

सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्क्यांच्या आतच आरक्षण असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर राज्यात नवे राजकीय समीकरण निर्माण झाले आहे.

या आदेशानुसार विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक जिल्हा परिषदांमध्ये ५०% मर्यादा ओलांडल्याने निवडणुका तात्पुरत्या अडथळ्यात येणार आहेत. यामुळे त्या भागातील ओबीसी मतदारांत नाराजी निर्माण होण्याची परिस्थिती आहे.

भाजपला याचे राजकीय दुष्परिणाम होऊ शकतात, अशी अंतर्गत धास्ती असल्यामुळे, जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढे ढकलून आधी महापालिकांच्या निवडणुका घेण्याचा पर्याय आयोग व सरकार समोर ठेवत असल्याचे संकेत मिळत आहेत.

### नगरपरिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीत गाजले मतदान

मंगळवारी झालेल्या राज्यातील २६३ नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांमध्ये सरासरी ६७.६३ टक्के मतदानाची नोंद झाली.
यात काही रोचक आकडेवारी :
**मुरगूड नगरपालिका** – ८८% (राज्यात सर्वाधिक)
**मलकापूर** – ८७%
**वडगाव** – ८६%
**तळेगाव दाभाडे** – ४९% (सर्वात कमी)
**बुलढाणा** – ५४%
**रत्नागिरी** – ५५%
**वनडोंगरी** – ५५%
या टप्प्यातील यशस्वी मतदान प्रक्रियेनंतर आता आयोगाचे सर्व लक्ष नागरी प्रभागांच्या सर्वात महत्त्वाच्या महापालिका निवडणुकीकडे आहे.

### महापालिका रणधुमाळीची चाहूल — राजकीय पक्ष सज्ज

मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर
अशा मोठ्या महापालिकांमध्ये
सत्तापालटाची किंवा सत्तास्थिरतेची लढाई अत्यंत तीव्र असेल.
मुंबईत शिवसेना (उभय गट), भाजप आणि काँग्रेस–राष्ट्रवादीची नवी युती एकमेकांसमोर

### पुण्यात भाजप विरुद्ध महाविकास आघाडी

पिंपरी-चिंचवडमध्ये अंतर्गत संघर्ष आणि भाजपची पुनर्प्राप्ती मोहीम
ठाण्यांत शिवसेना शिंदे गटाची प्रतिष्ठा
नाशिकमध्ये मनसे विरुद्ध इतर पक्ष असा रोचक सामना
निवडणूक आयोगाकडून घोषणा होताच राज्यातील राजकीय वातावरणात प्रचंड उलथापालथ अपेक्षित आहे. सभागृहातून निवडणूक आयोगाच्या दालनापर्यंत — पुढील काही आठवडे निर्णायक
हिवाळी अधिवेशनात महत्त्वाचे विधेयक, आरक्षण, प्रशासकीय प्रश्न, आणि आर्थिक विषयांवर चर्चा होणार असल्याने, निवडणुकीची घोषणा अधिवेशनानंतरच होण्याची शक्यता १००% जवळपास दिसते.
मतदार याद्या शुद्ध करण्याचे काम
प्रभाग रचना तपासणी
कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण
मतदान केंद्रांची संरचना
सुरक्षा नियोजन
ही सर्व कामे झपाट्याने सुरू आहेत.

## महापालिका निवडणुकांवर सर्वांचे लक्ष

नगरपालिका–नगरपंचायतींच्या यशस्वी मतदानानंतर आता महापालिकांकडे राज्याचे राजकीय लक्ष केंद्रित झाले आहे. मतदार याद्यांतील त्रुटी, जिल्हा परिषदांच्या निवडणुकीतील अडथळे, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा, आणि पक्षांतर्गत रणनीती— या सर्वांमुळे आगामी आठवडे अत्यंत निर्णायक ठरणार आहेत.

## पारा ११ अंशावर घसरला

## पुढील काही दिवस कडाक्याची थंडी पडणार

# पुणेकरांनो, स्वेटर-शाली बाहेर काढा!

### तीन दिवसांपासून थंडीचा जोर कायम

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे शहरात गेल्या तीन दिवसांपासून सकाळच्या थंडीचा जोर कायम असून, किमान तापमानाचा (WEATHER) पारा सतत घसरत आहे. त्यामुळे पुणेकरांनी सोमवार, मंगळवार आणि बुधवार (ता.३) सलग तीन दिवस पहाटेच्या थंडीत हुडहुडी भरवणारा माहोल अनुभवला. तर पुढील दोन दिवस किमान तापमान स्थिर राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. वातावरणातील कोरडेपणा वाढल्याने आणि रात्रीच्या वेळी गारठा अधिक तीव्र झाल्याने हिवाळ्याची तीव्रता प्रकर्षाने जाणवत आहे.**



शहर आणि परिसरात बुधवारी किमान तापमान सुमारे ११.५ अंश सेल्सिअस इतके तर कमाल तापमान २८ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले. पुढील दोन दिवस हवामान स्थिर राहणार असून त्यानंतर मात्र किमान तापमानात किंचित वाढ होण्याची शक्यता असल्याचे हवामानशास्त्र विभागाने सांगितले आहे. परिणामी थंडीचा कडाका आणखी काही दिवस कायम राहील अशी शक्यता आहे. पुणे आणि परिसरामध्ये गुरुवारी (ता. ४) किमान तापमानात किंचित वाढ होणार असून किमान तापमान १२ अंश सेल्सिअस इतके तर कमाल तापमान २९ अंश सेल्सिअस नोंदविण्यात येणार आहे. आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता आहे. मात्र शुक्रवारपासून (ता. ५) पुढील तीन दिवस कमाल आणि किमान तापमानात किंचित घट होण्याची शक्यता असून कमाल तापमान २८ अंश सेल्सिअस तर किमान तापमान ११ अंश सेल्सिअस पर्यंत नोंदविण्यात येणार आहे. आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.राज्यातील थंडीचा कडाका तीव्र होत असून पुन्हा एकदा किमान तापमानात मोठी घट होण्यास सुरुवात झाली आहे. म्हणूनच पुढील 48 तासांत थंडीची ही लाट अधिक तीव्र होणार आहे . यामध्ये पुणे अहिल्यानगर, नाशिक ,जळगाव, नंदुरबार, धुळे येथील किमान तापमान तीन ते चार अंशाने घसरेल असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात येत आहे. इतकंच नव्हे तर काही भागात पारा सात ते आठ अंशापर्यंत खाली येण्याची शक्यता असल्यानं राज्यात थंडीची लाट आणखी तीव्र होणार आहे. मागील 24 तासांत उत्तर महाराष्ट्रात थंडीची कडाक्याची लाट आली असून ,नाशिक जिल्ह्यात मंगळवारी किमान तापमान 10.3 अंशांवर होतं तर महाबळेश्वरमध्ये हा आकडा 12 अंशांवर होता. ज्यामुळं नाशिक महाबळेश्वरपेक्षाही थंड ठरत आहे.पुणे शहरात गेल्या तीन दिवसांपासून सकाळच्या थंडीचा जोर कायम असून, किमान तापमानाचा (WEATHER) पारा सतत घसरत आहे. त्यामुळे पुणेकरांनी सोमवार, मंगळवार आणि बुधवार (ता.३) सलग तीन दिवस पहाटेच्या थंडीत हुडहुडी भरवणारा माहोल अनुभवला. तर पुढील दोन दिवस किमान तापमान स्थिर राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. वातावरणातील कोरडेपणा वाढल्याने आणि रात्रीच्या वेळी गारठा अधिक तीव्र झाल्याने हिवाळ्याची तीव्रता प्रकर्षाने जाणवत आहे.

शहर आणि परिसरात बुधवारी किमान तापमान सुमारे ११.५ अंश सेल्सिअस इतके तर कमाल तापमान २८ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले. पुढील दोन दिवस हवामान स्थिर राहणार असून त्यानंतर मात्र किमान तापमानात किंचित वाढ होण्याची शक्यता असल्याचे हवामानशास्त्र विभागाने सांगितले आहे.

परिणामी थंडीचा कडाका आणखी काही दिवस कायम राहील अशी शक्यता आहे. पुणे आणि परिसरामध्ये गुरुवारी (ता. ४) किमान तापमानात किंचित वाढ होणार असून किमान तापमान १२ अंश सेल्सिअस इतके तर कमाल तापमान २९ अंश सेल्सिअस नोंदविण्यात येणार आहे. आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता आहे. मात्र शुक्रवारपासून (ता. ५) पुढील तीन दिवस कमाल आणि किमान तापमानात किंचित घट होण्याची शक्यता असून कमाल तापमान २८ अंश सेल्सिअस तर किमान तापमान ११ अंश सेल्सिअस पर्यंत नोंदविण्यात येणार आहे.

### पुणे शहरात हुडहुडी कायम

आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.राज्यातील थंडीचा कडाका तीव्र होत असून पुन्हा एकदा किमान तापमानात मोठी घट होण्यास सुरुवात झाली आहे. म्हणूनच पुढील 48 तासांत थंडीची ही लाट अधिक तीव्र होणार आहे . यामध्ये पुणे अहिल्यानगर, नाशिक ,जळगाव, नंदुरबार, धुळे येथील किमान तापमान तीन ते चार अंशाने घसरेल असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात येत आहे.

# सेट पेपर फुटीप्रकरणी सखोल चौकशीची मागणी

## लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल करून पेपर फोडण्यात आल्याची कबुली

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील (PUNE UNIVERSITY) राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) पेपर फुटी प्रकरणानी आरोपींकडून झालेल्या थेट कबुलीजबाबानंतर विद्यापीठाच्या सेट विभागाच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल करून पेपर फोडण्यात आल्याची कबुली समोर आल्यानंतर या घोटाळ्याची व्याप्ती अधिक गंभीर बनली असून संपूर्ण प्रशासनालाच जबाबदार धरण्यात येत आहे.**



यावेळी सेट पेपर (SET EXAM)फुटीप्रकरणी केवळ बदली नव्हे, सखोल चौकशीची गरज असे राहुल ससाणे यांनी संगीतले आहे.विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीने या संपूर्ण प्रकरणावर सुरुवातीपासूनच लक्ष ठेवले असल्याचे स्पष्ट करत, यामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांची सखोल, नि:पक्ष चौकशी करावी, अशी ठाम मागणी पुन्हा एकदा केली आहे.

आरोपींच्या कबुलीनंतर विद्यार्थ्यांमध्ये मोठा गोंधळ व अस्वस्थता निर्माण झाली आहे. पात्रतेसाठी प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर या प्रकरणामुळे संशयाची छाया पडली आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या भविष्यावर होत असून संपूर्ण शैक्षणिक प्रक्रियेची विश्वासार्हताच धोक्यात आली आहे,

असा आरोप समितीने केला आहे.दरम्यान, विद्यापीठ प्रशासनाने सेट विभागातील तत्कालीन समन्वयकांना पदावरून हटवून त्यांच्या जागी डॉ. अविनाश कुंभार यांची नियुक्ती केल्याची माहिती समोर आली आहे.भ्रष्टाचारावर पडदा टाकण्यासारखे आहे.

### शिक्षक पदासाठी जागा खाली

त्याचबरोबर त्या संदर्भात नियुक्तीचे परिपत्रक ही जाहीर केले नाही, असे स्पष्ट शब्दांत कृती समितीचे पदाधिकारी म्हणतात. केवळ सेट समन्वयकाची हकालपट्टी पुरेशी नाही. पेपरफुटीत सहभागी सर्व दोषी कर्मचारी-अधिकाऱ्यांचे निलंबन व विद्यार्थ्यांच्या आर्थिक नुकसानीची भरपाई झाली पाहिजे. पुढे सेट परीक्षा पुणे विद्यापीठाकडे न देता रोटेशन पद्धतीने इतर विद्यापीठांना आयोजन द्यावे, अशी राज्यपालांकडे मागणी करणार आहेत.पुणे विद्यापीठामध्ये काम करू पाहणाऱ्या इच्छुकांसाठी ही महत्वाची भरती आहे. शिक्षक पदासाठी ही भरती आयोजित करण्यात आली आहे.

**धक्कादायक...** केवळ एका क्लोचिंग क्लासनेच अग्निशमन विभागाकडून अग्निसुरक्षा प्रमाणपत्र घेतले

# कोचिंग क्लासकडून नियम धाब्यावर!

## शहरात ६४२ कोचिंग क्लास;केवळ एकाकडेच अग्निसुरक्षा प्रमाणपत्र

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड :पिंपरी - चिंचवड महापालिका क्षेत्रामधील सर्व कोचिंग क्लासेस, शाळा, हाविद्यालये, प्रशिक्षण केंद्रे अशा विविध शैक्षणिक संस्थांसाठी अग्निसुरक्षा नोंदणी आणि अग्नी सुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र अनिवार्य आहे. मात्र, शहरात तब्बल ६४२ कोचिंग क्लास आहेत. त्यापैकी केवळ एका क्लोचिंग क्लासनेच अग्निशमन विभागाकडून अग्निसुरक्षा प्रमाणपत्र घेतले असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.**



पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन रोड येथील प्राइम स्क्वेअर इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील कोचिंग क्लासमध्ये सोमवारी (दि. १) दुपारी पावणेतीनच्या सुमारास अचानक आग लागली. अवघ्या काही मिनिटांत या आगीने रौद्र रूप धारण केले. या आगीतून क्लास मधील ४२ विद्यार्थी सुखरूप बाहेर आले. मात्र, क्लासच्या पाचव्या मजल्यावरिल हॉटेलात नऊ कर्मचारी अडकून पडले. या कर्मचाऱ्यांना महापालिका अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीची मोहीम राबवत रेस्क्यू केले. त्यामुळे त्यांचे प्राण वाचले. अशीच घटना काही महिन्यापूर्वी पुण्यातील एका अभ्यासिकेमध्ये घडली होती. तर, गुजरातमध्येही काही महिन्यापूर्वी कोचिंग क्लासला आग लागल्याने विद्यार्थ्यांनी इमारतीवरून उड्या मारल्याने ११ विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागल्याची घटना घडली होती. शाळा, अभ्यासिका, किंवा क्लोचिंग क्लासला आग लागण्याच्या घटना वेळावेळी घडतात. मात्र, या शैक्षणिक संस्थांनी अग्निसुरक्षा नोंदणी आणि अग्नी सुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र घेतले आहे की नाही, हे पाहण्याकडे प्रशासनाचेही दुर्लक्ष होत आहे. एखादी गंभीर घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येते. चिखली येथे हार्डवेअर दुकानाला आग लागून एकाच कुटूंबातील चार जणांचा मृत्यु झाला होता. या घटनेनंतर महापालिकेने शहरातील सर्व व्यावसायिक मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. अशा दुर्घटना भविष्यात होऊ नये याकरीता शहरातील विविध व्यावसायिक मिळकतीमध्ये अग्निप्रतिबंधात्मक उपायोजना उपलब्ध आहे किंवा नाही याची खातरजमा करण्याकरीत्।। अग्निप्रतिबंधात्मक सर्वेक्षण करण्यात आले होते.

महापालिका क्षेत्रातील व्यावसायिक, औद्योगिक, शैक्षणिक, संस्थात्मक व वैद्यकिय इमारतीचे अग्नि प्रतिबंधात्मक सर्वेक्षण झालेल्या सुमारे ४३ हजार ९४१ हजार मिळकतीपैंकी बहुतांश मिळकतींमध्ये अग्नि प्रतिबंधात्मक उपययोजना उपलब्ध नसल्याचे या सर्वेक्षणातून दिसून आले होते. महापालिकेने औद्योगिक आणि वैद्यकीय संस्थांनी अग्निसुरक्षा प्रमाणपत्र घ्यावे, याकडे विशेष लक्ष दिले होते. मात्र, प्रत्येक शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालय, कोचिंग क्लास, अकादमी किंवा प्रशिक्षण केंद्र यांनाही अग्निसुरक्षा प्रमाणपत्र बंधनकारक आहे. त्यासाठी महापालिकेकडून अशा संस्थांना प्रति चौरस मीटर १० रूपये शुल्क आकारले जाते. अग्निशमन यंत्रणा, आपत्कालीन मार्ग, फायर अलार्म प्रणाली तसेच प्रशिक्षित कर्मचारी यांची उपलब्धता ही प्रत्येक संस्थेची जबाबदारी आहे. शहरात तब्बल ६४२ कोचिंग क्लास आहेत. मात्र, यापैकी केवळ एका कोचिंग क्लासने अग्निशमन विभागाकडून अग्निसुरक्षा प्रमाणपत्र घेतले असल्याचे समोर आले आहे. विद्यार्थ्यांकडून भरमसाठ फी आकारणाऱ्या अशा खासगी क्लोचिंग क्लास चालविणऱ्या संचालकांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत काहीही सोयरसुतक नसल्याचे यातून दिसून येत आहे. संबंधित सर्व शैक्षणिक संस्थांनी अग्निशमन विभागामध्ये ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करून अधिकृत अग्निसुरक्षा प्रमाणपत्र घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून करण्यात आले आहे.

### ऑनलाइन नोंदणीची सुविधा

पिंपरी चिंचवड महापालिकेने अग्निसुरक्षा तपासणी व नोंदणीसाठी व प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ही सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, शहरातील अग्निशमन विभागामार्फत यासंबंधी 'क्यूआर कोड' प्रसिद्ध करण्यात आला असून, तो स्कॅन करून आवश्यक कागदपत्रे सादर करून नोंदणी आणि अग्निसुरक्षा प्रमाणपत्रासाठी अर्ज करता येणार आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये दररोज अनेक विद्यार्थी उपस्थित असतात आणि त्यांच्या सुरक्षेची हमी देणे ही शैक्षणिक संस्था चालकाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळेच नोंदणी आणि अधिकृत अग्निसुरक्षा प्रमाणपत्र प्रत्येक शैक्षणिक संस्थेने घेणे अनिवार्य आहे, असे महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी स्पष्ट केले.

"पिंपरी चिंचवड शहरातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसनी विद्यार्थ्यांची सुरक्षितता केंद्रस्थानी ठेऊन संभाव्य धोका टाळण्यासाठी तातडीने अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करून ती कायमस्वरूपी सक्षम आणि सुसज्ज ठेवणे आवश्यक आहे. ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया ही संस्थांच्या सोयीसाठी आणि पारदर्शकतेसाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. अग्निसुरक्षा प्रणाली नियमितपणे अद्ययावत ठेवावी. वेळेवर घेतलेली ही खबरदारी गंभीर दुर्घटना टाळण्यास नक्कीच मोठी भूमिका बजावू शकते."

**-ऋषिकांत चिपाडे,** (अग्निशमन अधिकारी-महापालिका)

---

# "हरित सेतू हटाव प्राधिकरण बचाव" नागरिकांचे उत्स्फूर्त आंदोलन

## एनपीआरएफ फाउंडेशनचा हरित सेतू प्रकल्पाला तीव्र विरोध

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

"हरित सेतू हटाव प्राधिकरण बचाव" अशा घोषणा देत निगडी, आकुर्डी प्राधिकरण मधील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे मनपा प्रशासनाच्या मनमानी कारभारा विरोधात आंदोलन करून रास्ता रोको केला. निगडी, आकुर्डी प्राधिकरण परिसरात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने हरित सेतू प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पामुळे अनेक वर्षांपासून वाढलेले देशी वृक्ष तोडण्यात येतील. त्यामुळे पर्यावरणाची हानी होईल. सर्व रस्ते छोटे करून पदपथ मोठे केले जात आहेत. यामुळे वाहतूक कोंडी होऊन अनेक समस्या निर्माण होतील व अपघात होण्याची शक्यता आहे. हा हरीत सेतू प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करावा यासाठी "निगडी प्राधिकरण रेसिडेंट फोरम फाउंडेशन" (एनपीआरएफ फाउंडेशन) या संस्थेच्या वतीने बुधवारी (दि.३ डिसेंबर), सायंकाळी हुतात्मा चौक, आनंद हॉस्पिटल जवळ, निगडी प्राधिकरण येथे आंदोलन करण्यात आले.

संस्थेच्या आवाहनास प्रतिसाद देत परिसरातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सक्रिय सहभागी होऊन प्रशासनाच्या विरोधात काळे झेंडे दाखवून, काळ्याफिती लावून, हातात निषेधाचे फलक धरून आंदोलन केले. यानंतर संस्थेच्या वतीने नागरिकांच्या सह्यांची मोहीम राबवण्यात आली. यामध्ये शेकडो नागरिकांनी सह्या करून निषेध नोंदविला. या परिसरात हरित सेतू प्रकल्प व्हावा अशी कोणाचीही मागणी नाही, तरी देखील कोट्यावधी रुपये खर्च होणारा हा प्रकल्प सुरू केला आहे. नागरिकांच्या गरजा, वाहतुकीची सध्याची परिस्थिती, परिसराची रचना याचा विचार केला नाही. खर्चिक, अनावश्यक प्रकल्प जबरदस्तीने राबविण्याचे धोरण महापालिकेने रद्द करावे. या प्रकल्पामुळे मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण होऊन अपघात होतील. या प्रकल्पाच्या विरोधात येथील नागरिकांनी वेळोवेळी निवेदने दिली आहेत.

### आंदोलनात यांचा सहभाग

या आंदोलनात शैलजा मोरे, अनुप मोरे, शर्मिला बाबर, राजू मिसाळ, अमित गावडे, भारती फरांदे, धनंजय काळभोर, आप्पा बागल, आबा ताकवणे, योगेश बाबर, विजय शिणकर, वैभवी घोडके, श्रीमंत जगताप, बाळा शिंदे, रामभाऊ पांढरकर, अतुल इनामदार, प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आनंदराव मुलुक व सभासद तसेच विविध सामाजिक संघटना व सोसायटयाचे पदाधिकारी आदींसह






# असे आमचे खासदार, करणार विकास!

**लोकसभेच्या नवनिर्वाचित ५४३ खासदारांपैकी २५१ (४६ टक्के) सदस्यांवर फौजदारी गुन्हे दाखल असून त्यापैकी २७ जणांना दोषी ठरविण्यात आले आहे. 'असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' या संस्थेतर्फे ही आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. आतापर्यंतची ही सर्वांत जास्त टक्केवारी असल्याचे सांगण्यात येते. असे गुन्हेगारी वृत्तीचे खासदार आपल्या देशाचा विकास कसा करणार हा खरा कळीचा मुद्दा आहे.**



राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाबद्दल सार्वत्रिक चिंता व्यक्त केली जात असली, तरी याला आळा बसणार कसा, हा मोठा प्रश्न आहे. निवडून येण्याची क्षमता किंवा सत्तेच्या समीकरणात संख्याबळाला महत्त्व असल्याने राजकीय पक्ष खाका वर करतात. वास्तविक राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्याची जबाबदारी ही राजकीय पक्षांची. पण सत्तेसाठी राजकीय पक्ष वा नेते कोणत्याही थराला जातात, ते पाहता राजकीय नेतृत्वाकडून अपेक्षा करणेच चुकीचे ठरेल. याबाबत स्वयंसेवी संस्थाही प्रयत्न करून थकल्या. राजकारणी, संसदेकडून प्रतिसाद मिळणे कठीण असल्याने शेवटी साऱ्या अपेक्षा या न्यायालयावर होत्या. पण न्यायालयाकडूनही सामान्य जनतेची पुन्हा एकदा निराशाच झाली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना कायद्याने रोखता येत नाही, कारण कायद्यात तशी तरतूदच नाही. यातूनच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांचे फावते. त्यामुळे अशांना राजकीय पक्षांनी उमेदवारीच देऊ नये, असा युक्तिवाद निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात केला होता. पण सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाचा हा युक्तिवाद मान्य केला नाही. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना उमेदवारी देऊ नये यासाठी राजकीय पक्षांवर बंधन आणता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने निकालात स्पष्ट केले आहे. याऐवजी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना उमेदवारी का देण्यात आली, याची कारणमीमांसा करणे राजकीय पक्षांवर बंधनकारक करण्यास सर्वोच्च न्यायालयाने अनुकूलता दर्शविली. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना उमेदवारी का देण्यात आली, हे समाजमाध्यम, वृत्तपत्रे आणि पक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर राजकीय पक्षांनी स्पष्ट करावे, ही निवडणूक आयोगाची सूचना सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारली आहे. परंतु प्रश्न असा की, या अशा जाहिराती प्रसिद्ध करून राजकारणाच्या गुन्हेगारीला आळा कसा बसेल? उमेदवारांच्या विरोधातील गुन्ह्यांची माहिती प्रसिद्ध करणे किंवा मतदान केंद्रांवर लावण्याचे बंधनकारक करण्यात आले; त्याचा किती फायदा झाला, हा संशोधनाचाच विषय ठरावा. यंदाच्या लोकसभेत फौजदारी गुन्हे दाखल असलेल्या उमेदवारांची सर्वाधिक संख्या आहे. सन २०१४ मध्ये १८५ (३४ टक्के), २००९ मध्ये १६२ (३० टक्के) आणि २००४ मध्ये १२५ (२३ टक्के) खासदारांनी स्वत:वर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे जाहीर केले होते. विश्लेषणानुसार सन २००९ पासून गुन्हेगारी गुन्हे दाखल असलेल्या खासदारांच्या संख्येत ५५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. यंदा विजयी झालेल्या २५१ उमेदवारांपैकी १७० (३१ टक्के) उमेदवारांवर बलात्कार, खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण आणि महिलांवरील गुन्ह्यांसह गंभीर गुन्हे दाखल आहेत. सन २००९ पासून गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या खासदारांच्या संख्येत १२४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. नव्या लोकसभेत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आलेल्या भारतीय जनता पक्षाच्या २४० विजयी खासदारांपैकी ९४ (३९ टक्के) खासदारांवर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे 'एडीआर'ने जाहीर केले आहे. काँग्रेसच्या ९९ विजयी लोकप्रतिनिधींपैकी ४९ (४९ टक्के) खासदारांवर फौजदारी गुन्हे दाखल असून समाजवादी पक्षाच्या ३७ खासदारांपैकी २१ (४५ टक्के) उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. तृणमूल काँग्रेसच्या २९ पैकी तेरा (४५ टक्के), द्रमुकच्या २२ पैकी १३ (५९ टक्के), तेलगू देसमच्या १६ पैकी ८ (५० टक्के) आणि शिवसेनेच्या सात विजयी खासदारांपैकी पाच (७१ टक्के) उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या ८ हजार ३९० उमेदवारांपैकी १२१ उमेदवारांनी स्वत:ला निरक्षर, तर ३५९ उमेदवारांनी पाचवीपर्यंत शिक्षण घेतल्याचे जाहीर केले. अधिकृत आकडेवारीनुसार ६४७ उमेदवारांनी आठवीपर्यंतचे शिक्षण घेतले.

## प्रासंगिक »

### वाढते अपघात

*अपघात किंवा आगीनंतर स्वयंचलित बसचे दरवाजे जाम होतात.*

लोक आत अडकतात. बसमध्ये जास्त भार टाकणे, आपत्कालीन दरवाजे आणि खिडक्यांचा अभाव किंवा बिघाड यासारख्या असंख्य निष्काळजीपणामुळे प्रवाशांचे जीव जातात. डिझाइनमधील गंभीर त्रुटी असलेल्या बस धोकादायक परिस्थितीत रस्त्यावर धावत आहेत, याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न पडतो. प्रवासी बसमध्ये आग लागण्याच्या आणि मृत्यूच्या वारंवार होणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी विचार आणि ठोस कारवाई आवश्यक आहे.गेल्या महिन्यात देशांत मोठे बस अपघात झाले. उत्तर प्रदेश, राजस्थान, तमिळनाडूतील अपघाताची विशेष नोंद घेतली गेली. सरकार अपघातांच्या चौकशीसाठी समित्या नेमते. त्याचे अहवाल येतात; परंतु त्यावर काहीच कार्यवाही होत नाही. सुरक्षितपणे गाडी चालवण्यापासून ते योग्य सामान साठवणूक आणि बसमधील मार्ग मोकळे करण्यापर्यंत सुरक्षितता सुनिश्चित करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची असली पाहिजे.

काहीतरी वेगळं मनोवेधक, चित्तवेधक नेहमीच आकर्षणाचं केंद्रबिंदू ठरतं. असच एक सुंदर आणि आगळंवेगळं पुस्तक म्हणजे 'कविता आली सामोरी'! वाचकाच्या मनात कविता वाचल्यावर ही कविता कशी निर्माण झाली असेल? ही निर्माण करण्यामागची कवीची काय भूमिका असेल? कवीचा काय उद्देश असेल?

# जन्मकथा सांगणारी आगळीवेगळी कलाकृती

त्याच्या मनात त्यावेळी कोणत्या भावना असतील? असे असंख्य प्रश्न निर्माण होत राहतात. या सर्व प्रश्नांची उत्तरं देणारं एकमेव पुस्तक म्हणजे 'कविता आली सामोरी'! कवीच्या कवितेची जन्मकथा सांगणारे 'कविता आली सामोरी' हे केवळ बालसाहित्यातच नव्हे तर मराठी साहित्यातही एकमेव पुस्तक असावे! नेहमी प्रयोगशील आणि नावीन्यपूर्ण लेखन करण्यासाठी महाराष्ट्रात सतत चर्चेत असणारं नाव म्हणजे मेहकर येथील जेष्ठ साहित्यिक व समीक्षक किरण शिवहर डोंगरदिवे! हाडाचे शिक्षक असलेले किरण डोंगरदिवे जसे मुलांना शिकवतांना सतत प्रयोगशील व नावीन्यपूर्ण उपक्रम राबवतात तसेच ते लिखाणातही सतत काहीतरी इतरांपेक्षा वेगळं लिहून वाचकांचं लक्ष वेधून घेतात. महाराष्ट्रातील नामवंत अशा ७६ साहित्यिकांच्या साहित्यकृतीवर त्यांनी सविस्तर समीक्षा लेखन केलेले 'समकालीन साहित्यावलोकन,' तर अनेक कवींच्या कवितेतील स्त्री महत्वपूर्ण दृष्टिकोनातून रेखाटणारे



'काव्यप्रदेशातील स्त्री' हे दोन समीक्षा संग्रह मराठी साहित्य विश्वाच्या साहित्य समृद्धीत अमूल्य भर घालणारे आहेत. गेल्या २५ वर्षांपासून किरण डोंगरदिवे तरुण भारत, विदर्भ मतदार, महाराष्ट्र टाइम्स, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, लोकसत्ता यांसारख्या लोकप्रिय नियतकालिकेतून अक्षर वैदर्भी, किशोर, पाणिनी सारख्या बालमासिकंमधून, अनेक दिवाळी अंकातून सातत्याने लेखन करत आहेत. त्यांना विदर्भ साहित्य संघ, साहित्य विहार, अभिव्यक्ती साहित्य संघ, महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार, अमेरिकेतील मराठी कल्चर्ड ॲंड फेस्टिव्हल पुरस्कार असे जवळपास ७० पुरस्कार, साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात प्राप्त झाले आहेत. किरण डोंगरदिवे यांची 'शबरी' ही कविता सकाळ सप्तरंग नंतर पुढे किशोर मासिकात प्रकाशित झाली होती. एखादा जागरूक आणि रसिक वाचक कवितेच्या निर्मिती प्रक्रियेमागील सत्य जाणून घेण्यास उत्सुक असतो. अशाच एका रसिक वाचक स्त्रीने किरण डोंगरदिवे यांना फोन करून त्यांच्या 'शबरी' या अतिशय लोकप्रिय कवितेच्या मागील निर्मितीप्रक्रिया जाणून घेतली. त्यासोबतच 'शबरी' कवितेची जन्मकथा हा अनुभव लेख लिहा असा आग्रह केला. वाचकाच्या आग्रहस्तव लेखकाने 'शबरी' कवितेची निर्मिती मागची भूमिका स्पष्ट करणारा एक लेख लिहिला. तो लेख 'ऋगवेद' या बालमासिकात प्रकाशित झाला. 'ऋगवेद' मासिकाच्या संपादक सुभाष विभुते सरांनी याचसारखे आणखी इतर कवींच्या कवितेची निर्मिती प्रक्रिया सांगणारे लेख लिहून देऊ शकता का? असे डोंगरदिवे यांना विचारले. तिथून ही लेखमाला सुरु झाली व एक आगळेवेगळे पुस्तक वाचकांच्या हातात आले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## संचार साथी सक्तीचे नाही — प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये ॲपची सक्ती कशाला?

# प्रियंकांनी सरकारला खिंडीत गाठले!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोदी आणि शहांना या देशातील नागरिकांचे व्यक्ती स्वातंत्र्य काढून घ्यायचे असल्याने प्रत्येकाच्या घरात डोकावणारे संचार साथी ॲप सक्तीचे करण्याचा डाव असून असे झाल्यास नागरिक गुलाम होतील अशी भीती काँग्रेसच्या नेत्या खा. प्रियांका गांधी यांनी व्यक्त केली आहे.**

मोदी सरकारने कोट्यवधी मोबाईल धारकांना सक्तीचे केलेले संचार साठी हे एक हेरगिरी करणारे ॲप आहे. नागरिकांना गोपनीयतेचा अधिकार आहे. सरकारच्या लक्षात न येता कुटुंब आणि मित्रांना मेसेज पाठवण्याची गोपनीयता प्रत्येकाकडे असली पाहिजे, असे प्रियांका गांधी म्हणाल्या. भारतात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक नवीन स्मार्टफोनमध्ये सरकारने तयार केलेले 'संचार साथी' हे सायबर सुरक्षा ॲप प्रीइन्स्टॉल करावे लागणार आहे. याबाबत दूरसंचार विभागाने स्मार्टफोन उत्पादकांना कडक सूचना जारी केल्या आहेत. सायबर फसवणूक रोखणे त्यामागचा उद्देश आहे. स्मार्टफोन वापरकर्त्यांची सायबर सुरक्षा करण्यासाठी तयार केलेले हे ॲप वापरकर्त्यांना अनइन्स्टॉल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. परंतु, दूरसंचार विभागाच्या निर्देशांना काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी विरोध दर्शवला. तसेच हे ऍप असंवैधानिक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. स्मार्टफोन वापरकर्त्यांची सायबर सुरक्षा अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने भारतात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक नवीन स्मार्टफोनमध्ये 'संचार साथी' हे ऍप प्री-इन्स्टॉल करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जे फोन आधीच बाजारात विक्रीला आहेत, त्यांच्यामध्येही सॉफ्टवेअर अपडेटद्वारे ॲप देणे बंधनकारक करण्यात आले. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, स्मार्टफोन निर्मात्यांना या आदेशाची पुढील ९० दिवसांत अंमलबजावणी करणे अनिवार्य असेल. हा नियम ॲपल, सॅमसंगपासून ते शाओमी, गुगल, ओप्पो, व्हिवो यांसारख्या सर्व कंपन्यांना लागू आहे.

## ॲपवर देशभर दाटले संशयाचे ढग



केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे स्मार्टफोन वापरकर्त्यांची सुरक्षा वाढण्यास मदत मिळेल, तसेच आयएमईआय क्रमांकाशी छेडछाड करणे आता अजामीनपात्र गुन्हा ठरल्याने गैरप्रकारांना आळा बसेल, असे सरकारचे मत आहे. भारतात तयार होणाऱ्या किंवा आयात होणाऱ्या सर्व फोनमध्ये १२० दिवसांच्या आत हे ॲप प्री-इन्स्टॉल असणे आवश्यक आहे.

महत्त्वाचे म्हणजे, वापरकर्त्यांना हे ॲप अनइन्स्टॉल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. जरी कंपन्यांसाठी हे ॲप स्मार्टफोनमध्ये प्री-इंस्टॉल करणे अनिवार्य असले तरी, ते पूर्णपणे वापरकर्त्यावर अवलंबून आहे की त्यांनी हे ॲप वापरावे की नाही. हे ॲप सक्रिय होण्यासाठी किंवा वापरण्यासाठी नागरिकांना त्यात नोंदणी करणे अनिवार्य नाही. देशात एका वर्षात कोट्यवधींचे फ्रॉड झाले आहेत, त्यापासून संरक्षण करण्यासाठी हे गरजेचे आहे. विरोधी पक्षांनी या पवर 'सरकारी पाळत' ठेवल्याचा आरोप केला होता. या आरोपांना शिंदे यांनी निराधार ठरविले. हे आरोप पूर्णपणे निराधार आहेत. जनतेच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी हे ॲप आणले गेले आहे. ज्या व्यक्तिला ॲपचा वापर करायचा नसेल, त्यांच्या फोनमध्ये ते 'डॉरमेंट' निष्क्रिय) राहील, किंवा ते डिलीट करू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. मोदी सरकारने कोट्यवधी मोबाईल धारकांना सक्तीचे केलेले संचार साठी हे एक हेरगिरी करणारे ॲप आहे.

## हेरगिरी करणारे ॲप

नागरिकांना गोपनीयतेचा अधिकार आहे. सरकारच्या लक्षात न येता कुटुंब आणि मित्रांना मेसेज पाठवण्याची गोपनीयता प्रत्येकाकडे असली पाहिजे, असे प्रियांका गांधी म्हणाल्या. भारतात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक नवीन स्मार्टफोनमध्ये सरकारने तयार केलेले 'संचार साथी' हे सायबर सुरक्षा ॲप प्रीइन्स्टॉल करावे लागणार आहे.

नागरिकांना गोपनीयतेचा अधिकार आहे. सरकारच्या लक्षात न येता कुटुंब आणि मित्रांना मेसेज पाठवण्याची गोपनीयता प्रत्येकाकडे असली पाहिजे, असे प्रियांका गांधी म्हणाल्या.संचार साथी प्रकरणावरून केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया यांना स्पष्टीकरण द्यावे लागले आहे. हे ॲप वापरकर्त्यांना सक्तीचे नसून, इतर कोणत्याही ऍप प्रमाणे ते डिलीट करण्याचा पर्याय नागरिकांकडे उपलब्ध असेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

संसद भवनाच्या बाहेर पत्रकारांशी बोलताना सिंधिया म्हणाले की, या ॲपबद्दल जो काही गैरसमज पसरवला जात आहे, तो मी दूर करण्याचा प्रयत्न करत आहे. हे ॲप पूर्णपणे ग्राहक संरक्षणासाठी बनवले आहे. 'संचार साथी ॲप' हे इतर ॲप्ससारखेच असेल आणि वापरकर्त्यांना ते कधीही डिलिट करण्याचा पूर्ण अधिकार आहे. या आदेशावर काँग्रेससह विरोधी पक्षांनी तीव्र आक्षेप घेतला होता. के. सी. वेणुगोपाल यांनी मदतीच्या नावाखाली भाजप लोकांच्या खासगी माहितीपर्यंत पोहोचू इच्छितो, अशी टीका केली. तर शशी थरूर यांनी ॲप उपयुक्त असले तरी ते स्वैच्छिक असावे, अशी भूमिका मांडली. याच मुद्यावर चर्चा करण्यासाठी काँग्रेस खासदार रेणुका चौधरी यांनी मंगळवारी लोकसभेत स्थगन प्रस्तावही दिला आहे. हे एक हेरगिरी करणारे ॲप आहे.

# घोडबंदरवर १० महिन्यांत १८ जणांचा बळी

## रस्त्याच्या दुरवस्थेमुळे मृत्यू : उच्च न्यायालयाने घेतली गंभीर दखल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ठाणे शहरातील घोडबंदर मार्गावर जानेवारी ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत १८ जणांचा रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे मृत्यू झाल्याची माहिती मंगळवारी उच्च न्यायालयाला देण्यात आली. त्याची न्यायालयाने गंभीर दखल घेतली. तसेच या मार्गावर नेहमीच वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते, वाहने तासंनतास रांगेत उभी असतात, त्यामुळे येथून प्रवास करणे दुःस्वप्न असल्यासारखे असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.**

ठाण्यात वर्षभरात खड्ड्यांमुळे रस्ते अपघातात एकही मृत्यू न झाल्याचा महापालिकेचा दाव्यावर बोट ठेवून काही प्रसिद्ध झालेल्या वृत्तांनुसार ठाण्यात खड्ड्यांमुळे १८ मृत्यू झाल्याची माहिती याचिकाकर्ते ॲड. रुजू ठक्कर यांनी न्यायालयाला दिली. पीडितांच्या कुटुंबीयाना भरपाई देण्याची मागणी केली,कामासाठी दोषी आढळलेल्या कंत्राटदार आणि अधिका-यांवर कठोर शिस्तभंगाची आणि दंडात्मक कारवाई करण्याचीही मागणी केली आहे. त्याची गंभीर दखल घेऊन ही परिस्थिती सुधारण्यासाठी पुढील पावसाळ्याची वाट पाहू नका, असे खडेबोल न्यायालयाने



ठाणे पालिकेला सुनावले. ठाणे घोडबंदर आणि गायमुख घाटातील अरूंद रस्त्यामुळे अनेक वर्ष वाहतूककोंडीची समस्या कायम आहे. त्यात दिवसेंदिवस भरच घडत चालाली आहे. तरीही ठाणे पालिका याकडे गांभीर्याने का पाहत नाही? असा प्रश्न न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने उपस्थित केला. यावेळी न्यायमूर्तींना आलेला वैयक्तिक अनुभवही त्यांनी सांगितला. भाईंदरजवळील उतन येथे प्रवास करणे अशक्य असल्याचे न्या. डेरे यांनी नमूद केले. दुसरीकडे, वाण्याला उत्तर मुंबई, वसई विरार, भिवंडी, नाशिक आणि गुजरातशी जोडणारा घोडबंदर रोड हा व्यापार आणि वावसायाच्या दृष्टीकोनातून महत्वाचा दुवा आहे. ११ तास वाहतूककोंडी होणे हे भयावय असल्याचे मत न्या. पाटील यांनी व्यक्त केले.या प्रश्नी गठीत केलेल्या समितीने २८ सप्टेंबरला डोंबिवलीतील उघड्या नाल्यात वाहून गेलेल्या १३ वर्षीय आयुध कदमच्या पालकांना ६ लाख रुपये भरपाई देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती केडीएमसीच्या वतीने न्यायालयाला देण्यात आली. येत्या दोन आठवड्यात ही रक्कम कुटुंबीयांना देण्यात येईल, तसेच या घटनेसंदर्भात संबंधित अधिका-यांची चौकशीही सुरू असल्याचेही सांगितले.

## पालिका, पीडब्ल्यूडीला नोटीसा

प्रसिद्ध झालेल्या वृत्तांनुसार ठाण्यात खड्ड्यांमुळे १८ मृत्यू झाल्याची माहिती याचिकाकर्ते ॲड. रुजू ठक्कर यांनी न्यायालयाला दिली. पीडितांच्या कुटुंबीयाना भरपाई देण्याची मागणी केली,कामासाठी दोषी आढळलेल्या कंत्राटदार आणि अधिका-यांवर कठोर शिस्तभंगाची आणि दंडात्मक कारवाई करण्याचीही मागणी केली आहे.

## पाच नक्षलवादी ठार

## अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले

# बिजापूर-दंतेवाडा सीमेवर मोठी चकमक

## डीआरजीचा एक जवान शहीद



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त गंगलूर भागातील जंगलात बुधवारी (3 डिसेंबर) पहाटे सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली. हा परिसर दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेला लागून आहे, जिथे गेल्या अनेक महिन्यांपासून नक्षलविरोधी कारवाया सुरू आहेत. या चकमकीत पाच नक्षलवादी ठार झाले, तर कारवाईत डीआरजीचा एक जवान शहीद झाला. ही चकमक अजूनही सुरू असून दोन्ही बाजूंनी सतत गोळीबार सुरू आहे.**

### गंगलोर परिसरात चकमक सुरूच

अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, तर काही अजूनही दबावाखाली आहेत. या क्रमाने, आज सकाळी दंतेवाडा-विजापूर सीमेला लागून असलेल्या भैरामगड परिसरातील केशकुतुल जंगलात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली. विजापूर जिल्ह्यातील भैरामगड भागातून एक मोठी बातमी येत आहे. पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे.

सुरक्षा दलांकडून सुरू असलेल्या कारवाईमुळे नक्षलवादीमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहेत. अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, तर काही अजूनही दबावाखाली आहेत. या क्रमाने, आज सकाळी दंतेवाडा-विजापूर सीमेला लागून असलेल्या भैरामगड परिसरातील केशकुतुल जंगलात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली.विजापूर जिल्ह्यातील भैरामगड भागातून एक मोठी बातमी येत आहे. पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या चकमकीत एक डीआरजी जवान शहीद झाला. ही चकमक अजूनही सुरू आहे आणि दोन्ही बाजूंनी सतत गोळीबार सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बिजापूर जिल्ह्यातील भैरामगड भागात पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये ही चकमक सुरू आहे.मिळालेल्या माहितीनुसार, डीआरजी, एसटीएफ आणि कोब्रा बटालियनचे संयुक्त पथक पश्चिम बस्तर विभागात शोध मोहिमेसाठी निघाले होते. दरम्यान, ३ डिसेंबर रोजी आधीच दबा धरून बसलेल्या नक्षलवाद्यांनी सैनिकांवर गोळीबार केला. सैनिकांनी ताबा घेतला आणि प्रत्युत्तर दिले. प्राथमिक माहितीनुसार, या चकमकीत आतापर्यंत पाच नक्षलवादी ठार झाले आहेत.माओवादी कमांडर पापा राव यांच्या हद्दीतील गंगलोर परिसरात ही चकमक सुरू आहे. सुरक्षा दलांनी मोठ्या संख्येने माओवाद्यांना वेढले आहे. अधिकाऱ्यांच्या मते, परिसरात अधूनमधून गोळीबार सुरू असल्याने ठार झालेल्या माओवाद्यांची संख्या आणखी वाढू शकते. अधिकारी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. या कारवाईमुळे राज्यात नक्षलविरोधी आघाडीला पुन्हा एकदा मोठा फायदा झाला आहे. या वर्षी आतापर्यंत छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत २६८ नक्षलवादी मारले गेले आहेत. त्यापैकी २३९ जण एकट्या बस्तर विभागात मारले गेले, ज्यामध्ये विजापूर आणि दंतेवाडासह सात जिल्हे समाविष्ट आहेत. गरियाबंद जिल्ह्यात सत्तावीस नक्षलवादी मारले गेले. दुर्ग विभागात सुरक्षा दलांनी दोन नक्षलवाद्यांना ठार मारले. विजापूरमधील या कारवाईने पुन्हा एकदा सिद्ध केले की सुरक्षा संस्था “लाल दहशतवाद” उखडून टाकण्यासाठी सातत्यपूर्ण पावले उचलत आहेत. गंगलूर जंगलात सुरू असलेल्या शोध मोहिमेतून अधिक लक्षणीय जप्ती मिळण्याची अपेक्षा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सुरक्षा दलांना नक्षलवादी दहशतवाद उखडून टाकण्याचे निर्देश दिले आहेत आणि पुढील वर्षी मार्चपर्यंतची अंतिम मुदत दिली आहे.छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त गंगलूर भागातील जंगलात बुधवारी (3 डिसेंबर) पहाटे सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली. हा परिसर दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेला लागून आहे, जिथे गेल्या अनेक महिन्यांपासून नक्षलविरोधी कारवाया सुरू आहेत. या चकमकीत पाच नक्षलवादी ठार झाले, तर कारवाईत डीआरजीचा एक जवान शहीद झाला. ही चकमक अजूनही सुरू असून दोन्ही बाजूंनी सतत गोळीबार सुरू आहे. छत्तीसगडच्या नक्षलग्रस्त भागात सुरक्षा दलांकडून सुरू असलेल्या कारवाईमुळे नक्षलवादीमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

# एअरपोर्ट बॉम्बने उडवण्याची धमकी

## देशभरातील अनेक एअरपोर्टसवर चेक-इन सिस्टिम प्रभावित

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशभरातील विमानतळांबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे, देशातील अनेक एअरपोर्ट्सवर चेक-इन सिस्टिम प्रभावित झाली आहे. त्यामुळे एअरपोर्टसवर प्रवाशांचा मोठा खोळंबा झाल्याचे दिसून आले. चेक -इन सिस्टिम प्रभावित झाल्याने अनेक विमानांच्या उड्डाणावर परिणाम झाला. बंगळुरू एअरपोर्टवरून तब्बल 42 विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.**

दरम्यान कालच बंगळुरू एअरपोर्ट उडवून देण्याची धमकी ईमेलद्वारे पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यामुळे हा सायबर अटॅक तर नाही ना, असा देखील संशय व्यक्त केला जात आहे.चेक इन सिस्टिम प्रभावित झाल्याचा परिणाम हा हैदराबाद, बेंगलोर, दिल्ली आणि अन्य काही एअरपोर्टसवर दिसून आला. काही काळाने दिल्ली एअरपोर्टवर चेक इन प्रक्रिया मॅन्यूअल करण्यात आली.मायक्रोसॉफ्ट विंडोज च्या जागतिक आउटेजमुळे चेक इन सिस्टिम प्रभावित झाल्याचे प्रवाशांना वाराणसी एअरपोर्टवर सांगण्यात आले. दरम्यान मायक्रोसॉफ्टने हा दावा खोडून काढला आहे. विंडोजमध्ये कोणतीही तांत्रिक




अडचण नसल्याचे स्पष्ट केले. चेक - इन सिस्टिम प्रभावित झाल्यामुळे दिल्ली, हैदराबाद, बेंगलोर, वाराणसी आणि अन्य एअरपोर्टवर प्रवाशांचा खोळंबा झाल्याचे दिसून आले.दिल्ली बॉम्ब स्फोटाची घटना ताजी असतानाच देशातील प्रगत शहर म्हणून ओळख असलेल्या बेंगळुरू शहराला बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. 30 नोव्हेंबर रोजी बेंगळुरू शहर पोलिस आयुक्तांना धमकीचा ईमेल प्राप्त झाला. या ईमेलमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ, मॉल्स बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. बंगळुरू शहरात महत्वाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.दरम्यान हा ईमेल 30 तारखेला पोलिस आयुक्तांच्या अधिकृत ईमेलवर प्राप्त झाला. यानंतर एकच खळबळ उडाली. पोलिसांनी या ईमेल विरोधात गुन्हा दाखल केला आहे. सर्व संवेदनशील ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली आहे. प्राप्त झालेल्या ईमेलमध्ये जैश-ए-मोहम्मदच्या व्हाईट कॉलर टेरर टीमकडून एक चेतावणी आहे, आम्ही आंतरराष्ट्रीय विमानतळ, ओरियन मॉल, लुलू मॉल, फोरम साऊथ मॉल ही ठिकाणे बॉम्ब ब्लास्ट करण्यासाठी निश्चित केली

### बंगळुरू शहर टार्गेटवर?

ईमेल पाठविणाऱ्याचा शोध सुरू करण्यात आला आहे. हा धमकीचा ईमेल बंगळुरू शहर पोलिस आयुक्तांच्या अधिकृत ईमेल आयडीवर प्राप्त झाला. त्यानंतर वेगाने सूत्र फिरवली गेली आणि या सर्व ठिकाणी आणि अन्य महत्वाच्या ठिकाण सुरक्षा व्यवस्था चोख करण्यात आली आहे. दिल्लीत स्फोट झाल्यानंतर देशभरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

# आपली संस्कृती, आपला इतिहास!




महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील हमरापूर (आंबातपाडा) येथून आलेले तरुण दिग्दर्शक सचिन रामचंद्र आंबात आपल्या आदिवासी वारली संस्कृतीचा अभिमान आपल्या आगामी 'असुरवन' या मराठी चित्रपटातून संपूर्ण महाराष्ट्रापर्यंत पोहोचवत आहेत. महाराष्ट्राच्या लाल मातीच्या पार्श्वभूमीवर चित्रित झालेला हा चित्रपट 5 डिसेंबर रोजी राज्यभर प्रदर्शित होत आहे. स्वप्नस्वरूप प्रस्तुत या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे मोशन पोस्टर, टीझर आणि ट्रेलर सोशल मीडियावर प्रदर्शित झाल्यापासूनच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. पोस्टरवरील वाघाच्या प्रतिमेने सजलेला मुखवटा, घनदाट जंगलाचे अद्भुत सौंदर्य आणि आदिवासी वारली संस्कृतीची उपस्थिती यामुळे चित्रपटाबद्दलची उत्कंठा आणखी वाढली आहे.दिग्दर्शक सचिन आंबात सांगतात,"असुरवन हे माझ्या वडिलांचे स्वप्न आहे. आमची वारली संस्कृती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी, जतन व्हावी, यासाठी मी हा चित्रपट करण्याचा निर्णय घेतला. माझा भाऊ सागर रामचंद्र आंबात कार्यकारी निर्माता म्हणून संपूर्ण प्रकल्पात माझ्या पाठीशी ठामपणे उभा राहिला. मोशन पोस्टर आणि ट्रेलरवर प्रेक्षकांनी दिलेला प्रतिसाद अतिशय उत्साहवर्धक आहे." शूटिंग लोकेशनबद्दल सचिन आंबात सांगतात, "असुरवनचे संपूर्ण चित्रीकरण घनदाट जंगलात करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील विविध आदिवासी पाडे, बदलापूर येथील बोहोनोली गाव तसेच अंबरनाथमधील गोरपे गाव येथे शूटिंग झाले आहे. तसेच वारली संस्कृतीचे वारस सांगणारे एक प्राचीन मंदिरही चित्रपटात पाहायला मिळेल.कथानकाविषयी सांगताना दिग्दर्शक म्हणतात, "वारली संस्कृती ही निसर्गाशी घट्ट जोडलेली संस्कृती आहे. ते निसर्गालाच देव मानतात. त्यांचे जीवन, रहाणीमान आणि खाद्यसंस्कृती, हे सर्व काही निसर्गाभोवतीच फिरते. जंगलाचे रक्षण करण्यासाठी ते 'फिरसत्या' किंवा जंगलरक्षक देवाला पुजतात. वाघोबा देवाला ते जंगलाचा राजा मानतात.

# माधुरीचा 'मिसेस देशपांडे' लवकरच रिलीज

अभिनेत्री माधुरी दीक्षित तिचा नवीन शो 'मिसेस देशपांडे' घेऊन ओटीटीवर येणार आहे. नागेश कुकुनूर दिग्दर्शित 'मिसेस देशपांडे' या शोचा ट्रेलर रिलीज झाला आहे. सोमवारी मुंबईत या शोचा ट्रेलर लाँच करण्यात आला. दिग्दर्शक नागेश आणि सह-कलाकार प्रियांशु चॅटर्जी देखील माधुरीसोबत उपस्थित होते.या चित्रपटात माधुरी दीक्षितचे पात्र दोरीने अनेक लोकांना मारताना दाखवले आहे. पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी केली आणि असे आढळून आले की पीडितांना नायलॉनच्या दोरीने मारण्यात आले होते आणि मृतदेह आरशासमोर ठेवण्यात आले होते. हा २५ वर्षांपूर्वीचा सिरीयल किलर असल्याचे दिसते. ट्रेलरमध्ये पोलिस माधुरीची चौकशी करतात. माधुरी म्हणते, "मी इथे आत आहे. याचा अर्थ कोणीतरी माझी नक्कल करत आहे." त्यानंतर माधुरी पोलिस अधिकाऱ्याशी करार करते आणि म्हणते, "तुम्हाला माझी मदत हवी आहे, पण मला त्या बदल्यात काहीतरी हवे आहे." त्यानंतर ती पोलिसांना तपासात मदत करते. तर, ट्रेलरमध्ये खरा खुनी कोण आहे हे उघड झालेले नाही."मिसेस देशपांडे" या शोचा ट्रेलर अनेक प्रेक्षकांना आवडला आहे आणि ते त्यावर प्रतिक्रिया देत आहेत.

एका युजरने लिहिले की, "मी माधुरी दीक्षितला याआधी कधीही अशा प्रकारे पाहिले नव्हते." दुसऱ्या युजरने लिहिले की, "राणी पडद्यावर राज्य करण्यासाठी परतली आहे." दुसऱ्या युजरने लिहिले की, "हा शो अद्भुत असणार आहे. माधुरी दीक्षित नेहमीच चमकते. ही अभिनेत्री एक सुपरस्टार आहे."एएनआयशी बोलताना, माधुरी दीक्षितने आगामी थ्रिलर मालिकेतील तिच्या भूमिकेबद्दल उघडपणे सांगितले की, तिच्या चाहत्यांसाठी हे एक मोठे आश्चर्य असू शकते, तिने आतापर्यंत साकारलेल्या सर्वात बहुस्तरीय पात्रांपैकी एक असल्याचे म्हटले. माधुरी दीक्षित शो १९ डिसेंबर २०२५ रोजी जिओहॉटस्टारवर प्रसारित होणार आहे..हा शो कुकुनूर मूव्हीजच्या सहकार्याने ॲपलॉज एंटरटेनमेंटने तयार केला आहे. अभिनेत्री माधुरी दीक्षित तिचा नवीन शो 'मिसेस देशपांडे' घेऊन ओटीटीवर येणार आहे. नागेश कुकुनूर दिग्दर्शित 'मिसेस देशपांडे' या शोचा ट्रेलर रिलीज झाला आहे. सोमवारी मुंबईत या शोचा ट्रेलर लाँच करण्यात आला. दिग्दर्शक नागेश आणि सह-कलाकार प्रियांशु चॅटर्जी देखील माधुरीसोबत उपस्थित होते.या चित्रपटात माधुरी दीक्षितचे पात्र दोरीने अनेक लोकांना मारताना दाखवले आहे.



# आता माणुसकी राहिली नाही

सोशल मीडियावर आजकाल सेलिब्रिटींच्या अनेक बातम्या अनेकवेळा खोट्या निघतात किंवा अफवा पसरल्या जातात. यातच अनेक बातम्या या मृत्यूच्या देखील असतात. याबद्दलच आता अभिनेत्री जान्हवी कपूरने सोशल मीडिया आणि मीडियावर नाराजी व्यक्त केली आहे. तिच्या आई श्रीदेवी यांच्या निधनाचा आणि ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या अलिकडेच झालेल्या निधनाचा संदर्भ देत जान्हवीने खोट्या बातम्या पसरवणाऱ्यांवरही निशाणा साधला. सेलिब्रिटींचे जीवन सार्वजनिक झाल्यावर त्यांना येणाऱ्या आव्हानांबद्दल तिने सांगितले. सध्याच्या माध्यम वातावरणात अनेकदा हानिकारक बातम्यांना चालना मिळते असे ती म्हणाली."वी द वुमन २०२५" या कार्यक्रमात बोलताना जान्हवी म्हणाली की, या समस्येसाठी सेलिब्रिटी देखील जबाबदार आहेत. अभिनेत्री म्हणाली, "धरमजींसोबत काय घडले ते आपण पाहिले आहे आणि ते यापूर्वीही अनेक वेळा घडले आहे. मला खात्री आहे की ते आणखी परिस्थिती बिकट होईल. मला वाटते की आपण सर्वजण या समस्येचा भाग आहोत. प्रत्येक वेळी जेव्हा आपण व्हिडिओ, बातम्या किंवा दृश्ये, कमेंट्स, लाईक्स – योगदान देतो तेव्हा आपण ही संस्कृती कायम ठेवत असतो." जान्हवी म्हणाली की, तिच्या आईच्या मृत्यूचे माध्यमांमध्ये ज्या पद्धतीने चित्रण केले गेले त्यामुळे तिचे दुःख आणखी वाढले. "मी माझी आई गमावली तेव्हा ते खूप दुखद होते. तुमच्या इतक्या जवळच्या व्यक्तीला गमावणे आणि ते मीम बनताना पाहणे कसे असते याची तुम्ही कल्पनाही करू शकता का हे मला माहित नाही.

# मी माझ्या बायकोला घाबरतो

बॉलीवूडचा बादशाह किंग खान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहरुख खानची लव्हस्टोरी एखाद्या फिल्मी गोष्टीसारखीच आहे. गौरी आणि शाहरुख बॉलीवूडमधलं लोकप्रिय कपल आहे. दोघांना आदर्श कपल मानलं जातं.शाहरुख आणि त्याची पत्नी गौरी तरुण वयात भेटले आणि एकमेकांच्या प्रेमात पडले. जेव्हा शाहरुख गौरीच्या प्रेमात पडला तेव्हा तो १८ वर्षांचा होता. दोघंही दिल्लीमध्ये एका पार्टीत भेटले होते आणि त्यावेळेस ते पाच मिनिटांसाठी एकमेकांशी बोलले आणि नंतर शाहरुखला गौरीचा नंबर मिळाला. काही काळ एकमेकांना डेट केल्यानंतर दोघांनी १९९१ रोजी लग्न केलं.



# मी बोल्ड सीन करायला अगदीच तयार!

झी मराठी वाहिनीवरील 'माझिया प्रियाला प्रीत कळेना' या मालिकेतून अभिनेत्री मृणाल दुसानिसने मराठी मनोरंजनसृष्टीत पदार्पण केलं. या मालिकेतील शमिका आणि अभिजीतची जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आणि मालिकेला खूप प्रेम मिळालं. नंतर 'तू तिथे मी', 'हे मन बावरे' अशा अनेक मालिकांमध्ये ती झळकली.मृणालने त्यानंतर लग्न केलं आणि तिच्या पतीसह ती अमेरिकेला राहायला गेली. चार वर्ष अमेरिकेत राहिल्यानंतर मृणाल आता भारतात परतलीयं. एवढ्या मोठ्या ब्रेकनंतर मृणालला मालिकांमध्ये, चित्रपटांमध्ये, व्यावसायिक नाटकांमध्ये काम करायचंय; अशी इच्छा तिने व्यक्त केली आहे. कलाकारांनी आधी केलेल्या भूमिकांप्रमाणेच ते असतात, कलाकार अष्टपैलू असतात आणि ते कोणतीही भूमिका अगदी सहजरित्या करू शकतात. अगदी सोज्वळ, साध्या भूमिकेत आजवर दाखवली गेलेली मृणाल बोल्ड सीनपण करू शकते हे लोकांना पटतंच नाही. यावर नुकतीच ती एका मुलाखतीत बोलली आहे. नुकत्याच लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीत मृणाल म्हणाली, "मला ना लोकं ओळखतंच नाहीत. तुम्ही एखादं पात्र करता ना, तर त्यांना असं वाटतं की ती व्यक्ती तशीच आहे. म्हणजे मी बोल्ड सीन करायला अगदीच तयार आहे असं नाही.झी मराठी वाहिनीवरील 'माझिया प्रियाला प्रीत कळेना' या मालिकेतून अभिनेत्री मृणाल दुसानिसने मराठी मनोरंजनसृष्टीत पदार्पण केलं. या मालिकेतील शमिका आणि अभिजीतची जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आणि मालिकेला खूप प्रेम मिळालं.

## मालिकेत केली बरोबरी

## रोमांचक सामन्यात आफ्रिकेने भारताचा केला पराभव

# आफ्रिकेने विजयासह रचला विक्रम!

## ४ विकेट राखून भारताचा पराभव केला

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका (IND VS SA) यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना बुधवारी रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकाने ४ विकेट राखून भारताचा पराभव केला आहे आणि मालिकेत बरोबरी साधली आहे. हा दक्षिण आफ्रिकेचा परदेशी भूमीवरचा सर्वाधिक धावांचा पाठलाग होता. त्याआधी दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी अंमत्रित केले. भारताने फलंदाजी करत दक्षिण आफ्रिकेसमोर ३५९ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात, दक्षिण आफ्रिकेने ६ विकेट गमावून ४९.२ षटकांत लक्ष्य गाठले.**



नाणेफेक गमावल्यानंतर आणि फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, भारतीय संघाने स्थिर सुरुवात केली. रोहित शर्मा (१४) आणि यशस्वी जयस्वाल (२२) यांनी पहिल्या विकेटसाठी ४० धावा जोडल्या. रोहित पाचव्या षटकात बाद झाला, तर यशस्वी दहाव्या षटकात बाद झाला. त्यानंतर विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाड यांनी तिसऱ्या विकेटसाठी १९५ धावांची भागीदारी केली. गायकवाडने ८३ चेंडूत १२ चौकार आणि दोन षटकारांसह १०५ धावा केल्या. हे त्याचे पहिले एकदिवसीय शतक होते.कोहलीने ९३ चेंडूत १०२ धावा केल्या, ज्यामध्ये सात चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. कोहलीने त्याचे ५३ वे एकदिवसीय शतक आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ८४ वे शतक केले. वॉशिंग्टन सुंदर (१) चांगली कामगिरी करू शकला नाही. अशा परिस्थितीत, कार्यवाहक कर्णधार केएल राहुलने रवींद्र जडेजासोबत जबाबदारी सांभाळली. दोघांनी सहाव्या विकेटसाठी ६९ धावांची भागीदारी करून भारताला मोठी धावसंख्या गाठून दिली. राहुलने ४३ चेंडूत सहा चौकार आणि दोन षटकारांसह नाबाद ६६ धावा जोडल्या. जडेजाने २७ चेंडूत दोन चौकारांसह २४ धावांची नाबाद खेळी केली आणि भारताला ३५८ धावांपर्यंत पोहचवले. दक्षिण आफ्रिकेकडून मार्को जानसेनने दोन बळी घेतले, तर लुंगी एनगिडी आणि नांद्रे बर्गरने प्रत्येकी एक बळी घेतला.मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना, दक्षिण आफ्रिकेचा सलामीवीर एडेन मार्करामने ९८ चेंडूत ११० धावा केल्या. कर्णधार टेम्बा बावुमानेही ४६ महत्त्वपूर्ण धावा केल्या. चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना मॅथ्यू ब्रीट्झकेने ६८ धावा केल्या, तर देवाल्ड ब्रेव्हिसने ५४ धावा केल्या. या सामन्यात क्विंटन डी कॉक आणि मार्को जॅन्सन अपयशी ठरले. शेवटी, कॉर्बिन बॉशने १५ चेंडूत २९ धावांची संक्षिप्त पण महत्त्वाची खेळी खेळली आणि त्यांच्या संघाला ४ विकेटने विजय मिळवून दिला. एकदिवसीय क्रिकेट इतिहासात दक्षिण आफ्रिकेचा भारताविरुद्धचा हा सर्वात मोठा विजय आहे. टीम इंडियासाठी, अर्शदीप सिंग आणि प्रसिद्ध कृष्णाने प्रत्येकी दोन विकेट घेतल्या, जरी कृष्णा खूप महागडा ठरला.भारत आणि दक्षिण आफ्रिका (IND VS SA) यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना बुधवारी रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह स्टेडियमवर खेळला गेला.

### गायकवाडचे पहिले वनडे शतक

विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाड यांनी तिसऱ्या विकेटसाठी १९५ धावांची भागीदारी केली. गायकवाडने ८३ चेंडूत १२ चौकार आणि दोन षटकारांसह १०५ धावा केल्या. हे त्याचे पहिले एकदिवसीय शतक होते.कोहलीने ९३ चेंडूत १०२ धावा केल्या, ज्यामध्ये सात चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. कोहलीने त्याचे ५३ वे एकदिवसीय शतक आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ८४ वे शतक केले. वॉशिंग्टन सुंदर (१) चांगली कामगिरी करू शकला नाही.

या सामन्यात दक्षिण आफ्रिकाने ४ विकेट राखून भारताचा पराभव केला आहे आणि मालिकेत बरोबरी साधली आहे. हा दक्षिण आफ्रिकेचा परदेशी भूमीवरचा सर्वाधिक धावांचा पाठलाग होता. त्याआधी दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी अंमत्रित केले. भारताने फलंदाजी करत दक्षिण आफ्रिकेसमोर ३५९ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात, दक्षिण आफ्रिकेने ६ विकेट गमावून ४९.२ षटकांत लक्ष्य गाठले. नाणेफेक गमावल्यानंतर आणि फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, भारतीय संघाने स्थिर सुरुवात केली. रोहित शर्मा (१४) आणि यशस्वी जयस्वाल (२२) यांनी पहिल्या विकेटसाठी ४० धावा जोडल्या.

# रोहित शर्माचा रायपूरमध्ये ‘हिटमॅन’ शो!

## 14 धावा करताच रचला इतिहास; ‘द वॉल’ द्रविडला टाकले पिछाडीवर

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवण्यात येत आहे, या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निसणी घेतला तर भारतीय संघ प्रथम फलंदाजी करत आहे. भारतीय फलंदाजांनी आपली दमदार सुरुवात केली.**



या सामन्यात भारतीय सलामीवीर फलंदाज रोहित शर्मानि इतिहास रचला आहे.प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित करण्यात आल्यानंतर रोहित शर्मा आणि यशस्वी जयस्वाल या जोडीने संघाला आक्रमकपणे सुरुवात करून दिली. खरी पण जास्त वेळ ही जोडी मैदानात टिकू शकली नाही. या जोडीने त्यांनी फक्त चार षटकांत २८ धावा केल्या.

रोहितला सुरुवातीच्या षटकांत जास्त चेंडू खेळता आले नाहीत, परंतु संधी मिळताच त्याने त्याच्या शैलीत चौकार मारण्यास कसली कसूर सोडली नाही. या दरम्यान त्याने एक परकरां देखील केला.सलामीवीर रोहित शर्मानि पहिल्या चार षटकांमध्ये फक्त तीन चेंडूत २ धावा काढल्या होत्या. त्यानंतर त्याने नांद्रे बर्गरच्या षटकात सलग तीन चौकार मारून आक्रमक शैली स्वीकारली. या दरम्यान त्याने एक महत्त्वाचा टप्पा देखील गाठला. या चौकारांसह रोहितने भारतीय भूमीवर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपल्या ९००० धावा पूर्ण केल्या. या सामन्यापूर्वी रोहित शर्माला ही कामगिरी करण्यासाठी फक्त नऊ धावांची आवश्यकता होती. रोहित शर्मा आता घरच्या मैदानावर ९००० धावा पूर्ण करणारा चौथा भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे.

### रोहितने रचला विक्रम

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवण्यात येत आहे, या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निसणी घेतला तर भारतीय संघ प्रथम फलंदाजी करत आहे. भारतीय फलंदाजांनी आपली दमदार सुरुवात केली.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार ।

। दि. 4 डिसेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## एस.बी. पाटील स्कूलचे विद्यार्थी

# एनडीएच्या शौर्यसोहळ्याचे साक्षीदार!

### शिक्षण विश्व: विद्यार्थ्यांनी पाहिल्या सुखोई लढाऊ विमानांच्या चित्तथरारक कसरती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**पिंपरी चिंचवड :पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मधील नववीच्या २४८ विद्यार्थी व शिक्षकांना खडकवासला, पुणे येथील नॅशनल डिफेन्स अकॅडमी (एनडीए) च्या १४९ व्या अभ्यासक्रमाच्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहण्याची संधी मिळाली.**

डेप्युटी कमांडण्ट ऑफ एनडीए व मुख्य प्रशिक्षक एअर वाईस मार्शल सरताज बेदी, कमांडण्ट ऑफ एनडीए वाईस ऍडमिरल अनिल जग्गी, एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, समन्वयक वंदना सांगळे, पृथा वैद्य, प्रशासकीय व्यवस्थापक मनीष ढेकळे, एनडीएचे प्रशिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी व त्यांचे पालक आदी उपस्थित होते. यावेळी पासिंग आउट परेडचे उत्कृष्ट सादरीकरण झाले. हे खडतर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या भावी अधिकाऱ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये युवतींची संख्या देखील उल्लेखनीय होती.

वाईस ऍडमिरल, कमांडण्ट ऑफ एनडीए अनिल जग्गी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच एनडीएची स्थापना करण्याची संकल्पना, यापूर्वी युद्ध भूमीवर देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या अधिकारी व सैनिकांचे स्मरण केले.

उपस्थित विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा, उत्कृष्ट कॅडेट पुरस्कार समारंभ, ट्राय सर्व्हिस युनिटी, आर्मी, नेव्ही आणि एअर फोर्स मधील सहकार्याचे प्रदर्शन, परेड मधील शिस्त, अचूकता आणि औपचारिक शपथविधी पाहण्याची संधी मिळाली. या समारंभानंतर कॅडेट्स हे सैन्यात अधिकारी बनतात आणि देशसेवेसाठी सज्ज होतात. एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचे विद्यार्थी व विद्यार्थिनी हे शिस्तबद्ध संचलन पाहून भारावून गेले. समारोप प्रसंगी सुखोई लढाऊ विमानांनी केलेल्या चित्तथरारक कसरती पाहून विद्यार्थ्यांच्या मनात भारतीय सैन्याबद्दल जाज्वल्य अभिमान व आदर निर्माण झाला. शेवटी खेत्रपाल परेड मैदान, सुदान ब्लॉकची सुप्रसिद्ध इमारत, कॅडेटचे वसतिगृह या ठिकाणी भेट देण्याची संधी मिळाली. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## ‘दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी महापालिका कटिबद्ध’

### तृप्ती सांडभोर; पिंपरी चिंचवड पालिकेच्या वतीने जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिव्यांग नागरिकांना सबलीकरण, स्वावलंबन आणि सन्मानाची वागणूक देण्याचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका करत आहे. समाज विकास विभागाच्या वतीने दिव्यांग कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्याचे काम सुरू आहे. कौशल्य प्रशिक्षण, रोजगार संधी, शिक्षण-सुविधा आणि पथदर्शी कल्पनांमुळे दिव्यांग बांधवांचा आत्मविश्वास अधिक दृढ होत आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले.**




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली समाज विकास विभागाच्या वतीने दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या माध्यमातून चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात दिव्यांग बांधवांसाठी आयोजित कार्यक्रमात नवीन योजनांचे उद्घाटन व विविध उपक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त सांडभोर यांच्या हस्ते झाले त्यावेळी त्या बोलत होत्या.

सामाजिक संस्था तसेच विशेष प्राविण्य प्राप्त दिव्यांग नागरिक व विद्यार्थी यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला. दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख (माजी आयएएस), यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, यांच्यासह महापालिकेच्या उपायुक्त ममता शिंदे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी यांच्यासह मानव कांबळे, दत्तात्रय भोसले, सोनाली नवांगुळ, डॉ. तारकुंडे, संगीता जोशी उपस्थित होते.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs: Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046